ग्रामपंचायतीमध्ये मयत, राजीनामा व
अनर्हतेमुळे रिक्त झालेल्या पदांबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक रानिआ/ग्रापनि-२०१४/प्र.क्र.२ /का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक.
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३०/१२/२०१४.

## परिपत्रक

ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका त्यांची पाच वर्षांची मुदत संपण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येतात. सध्याच्या प्रथेप्रमाणे त्याच वेळेला त्या त्या जिल्हयांमध्ये पोटनिवडणुका घेण्याबाबतसुध्दा जिल्हाधिकारी यांना सूचित करण्यात येते.

२. ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा आढावा घेताना खालील बाबी प्रामुख्याने दिसून आलेल्या आहेत:-

(i) जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कोणत्या महिन्यामध्ये कोणत्या ग्रामपंचायतीची मुदत संपणार आहे याची बिनचूक माहिती उपलब्ध नसते.

(ii) रिक्त झालेल्या पदांची (सदस्याचा राजीनामा, अनर्हता व मयत यामुळे) बिनचूक माहितीसुध्दा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध नसते.

(iii) जिल्हाधिकारी यांना आतापर्यंत स्वातंत्र्य दिले गेले आहे की, त्यांनी सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी त्यांच्या जिल्हयामध्ये आवश्यक असणाऱ्या पोटनिवडणुका सुध्दा घ्याव्यात. मात्र त्यांची आकडेवारी व निवडणुका वेळेवर निश्चित केल्या जात नाहीत. उलट अनेकवेळा त्यामध्ये बदल केला जातो.

३. ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुका हयासुध्दा सार्वत्रिक निवडणुकीप्रमाणेच महत्वाच्या आहेत. त्याचा कार्यक्रमसुध्दा राज्य निवडणूक आयोगाकडून निर्गमित होणे आवश्यक आहे.

४. या बाबींवर आयोगाने गेल्या काही महिन्यांमध्ये सर्व जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत व बिनचूक माहिती ठेवण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याबाबत सूचित केले आहे. याप्रमाणे आपल्या जिल्हयामध्ये कार्यवाही झाली असेल असे गृहित धरण्यात येत आहे. तरीही यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

(i) जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याकडे असणाऱ्या ग्रामपंचायतींच्या मुदती कधी संपणार आहेत याची बिनचूक माहिती ठेवावी व ती वेळोवेळी अद्ययावत करावी.

(ii) मयत, राजीनामा व अनर्हता यामुळे रिक्त होणाऱ्या पदांचा तपशील त्वरित आयोगास कळवावा.

(iii) यापुढे सार्वत्रिक निवडणूकांबरोबरच आयोगाला पूर्ण आकडेवारी न देता पोट निवडणूकां घेण्याची प्रथा बंद करण्यात येत आहे.

(iv) यापुढे मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची संपूर्ण माहिती तसेच रिक्त पदांची संपूर्ण माहिती वेळेवर प्राप्त झाल्यावरच आयोगामार्फत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात येईल.

(v) मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची किंवा रिक्त झालेल्या पदांची संपूर्ण माहिती वेळेवर पाठविण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील. त्यांनी वेळेवर माहिती न पाठविल्यामुळे जर सार्वत्रिक किंवा पोटनिवडणुका वेळेवर होऊ शकल्या नाहीत तर नियमाप्रमाणे सर्व जबाबदारी जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी यांची राहील.

(vi) यासाठी जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांबरोबर उदा.(मुख्य कार्यकारी अधिकारी, उप जिल्हाधिकारी, गट विकास अधिकारी, इत्यादी) योग्य ती उपाययोजना करावी व ऑन लाईन संगणकीय प्रणाली वापरावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

30/12/14

(आरती सरवदे)

तहसिलदार,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

विभागीय आयुक्त (सर्व),

जिल्हाधिकारी (सर्व),

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

प्रत माहितीकरिता-

१) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

२) प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक:रानिआ/ग्रापंने-२०१४/प्र.क्र.२/ का-८, दिनांक ३०/१२/२०१४

## ग्रामपंचायत रिक्त सदस्य पदांची माहिती. (दि.  /  /२०१५ पर्यंत अद्ययावत)

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | रिक्त झालेल्या प्रत्येक पदाचा प्रभागनिहाय तपशिल | पद आरक्षित असल्यास राखीव जागेचा प्रवर्ग | पद रिक्त झाल्याचा दिनांक | ग्रामपंचायतीची मुदत समाप्तीचा दिनांक | पद रिक्त होण्याचे कारण | न्यायालयीन दावा दाखल आहे किंवा कसे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते कि, वर नमूद केलेली माहिती ही अद्ययावत व अचूक आहे.

जिल्हाधिकारी